म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २११५




REFBK-0023451
REFBK-0023451

सं. काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७५
ना. क्र. २३७५७
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२०७५
२३७४९
२०/२/८२

# अश्रूंची दरी

सुधाकर रामटेके
अनिल दहिवाडकर

REFBK-0023451
REFBK-0023451

मैथिली प्रकाशन, पुणे

अश्रूंची दरी

(श्री. सुधाकर रामटेके यांच्या मूळ इंग्रजी कवितांचा भावानुवाद
एक्यूमेनिकल डेव्हलपमेंट सेंटर ऑफ इंडिया, नागपूर,
यांचे करिता प्रकाशित)

प्रकाशन क्रमांक
एक

प्रथमावृत्ती
२६ जानेवारी १९८२

©
मैथिली प्रकाशन

किंमत
दहा रुपये

प्रकाशिका
सौ. उर्मिला दहिवाडकर
१२३३/अ साईछाया अपार्टमेंट
आपटे रोड, पुणे ४११ ००४

मुद्रक
ह. ल. निपुणगे
पुष्पक प्रिंटिंग एजन्सी
३८१ अ/१, शनिवार पेठ
पुणे ४११०३०

ती. बापूमामा चावरे
यांना

# प्रास्ताविक

## ' अश्रूंची दरी ' : एक वेदना : एक संवेदना !

प्रस्तुत ' अश्रूंची दरी ' हा काव्यसंग्रह मूळात ' सन्देश SANDESH ' या श्री. सुधाकर रामटेके यांच्या विचारसुन्दर काव्याचा मराठी अवतार आहे. त्यात श्री. रामटेके हे मूळ कवी आहेतच, पण रूपांतर करिताना श्री. दहिवाडकर हेही इष्ट ते सृजनशील साहित्यकाराचे कवित्वगुण घेऊनच पुढे पुढे जात आहेत हे स्पष्ट जाणवते.

मूळ श्री. सुधाकर रामटेके ( नागपूर ) हे हाडाचे कवी आहेत हे त्यांच्या ' संदेश ' मधील प्रत्येक कवितेत जाणवते. एका व्यापक सहानुभूतीने हे मन झपाटलेले आहे. दुःख, दारिद्य्र व दैन्य यांनी भारतीय जनसामान्यांची चाललेली ससेहोलपट त्यांच्या कविमनाला व्याकुळ करते. विविध समाजशक्तींत चाललेले संघर्ष ते डोळसपणे पहातात–अनुभवतात व मुक्तीचा मार्ग कोठे व कसा सापडेल आणि दया, करुणा यांच्या वाटेने जात ही मानवता सुखी व समाधानी कशी होईल याचे चिंतन-मनन करतात. ललित वाङ्मय हे केवळ कल्पनेच्या उंच मनोऱ्यात बंदिस्त असावे असे मुळीच नाही. मानवी मनाचे व सामूहिक समाज-मनाचे वास्तवदर्शनही ललित वाङ्मयाने घडावयास हरकत कसली ? आलेल्या प्रामाणिक अनुभूतीच्या आधारे समकालिन वास्तवाची नोंद कविमन करीतच असते. हीच त्यांची वाटल्यास ' सामाजिक बांधिलकी ' म्हणावी. अशा बांधिलकीच्या स्वभावसिद्ध वृत्तीतून निर्माण झालेली स्पंदने संग्रहात टिपलेली आहेत हे या काव्यविश्वाचे आगळेपण आहे. असले अनुभूतिजन्य, तळमळीचे, आर्त उद्‌गार, उत्तम वाङ्मयाचे भागीदार होतात यात संशय नाही.

अशा या विचारागर्भ, आशयघन व आशावादी काव्याचे मराठीत अवतरण श्री. अनिल दहिवाडकर यांनी मोठ्या समरसतेने केले आहे. एका दीपावर प्रज्वलित केलेला हा तसाच एक दुसरा दीप आहे. कविवर्य मर्ढेकर म्हणत असत की मराठीत विविध भाषांतील समृद्ध वाङ्मय खुशाल येऊ द्यावे. त्याने मराठीलाच समृद्धीच्या वाटा गवसतील. श्री. दहिवाडकरांनी हे रूपांतर करून मराठीत एक भेदक वास्तवतेचे दर्शन घडविणारे काव्य टाकठीक रीतीने आणून उभे केले आहे, याबद्दल त्यांचे अभिनंदन.

‘ हे दारिद्र्या ’ ही या संग्रहातील पहिलीच कविता समाजातील तळमळणाऱ्या, वंचित व दलित व्यक्तिजीवनांच्या यातनांचा वेध घेणारी आहे. मानवताच कशी पीडली व पिळली जात आहे याचे हे जिवंत चित्रण आहे.

रूपांतर करताना, असे म्हणतात की, एका बाटलीतील अत्तर दुसऱ्या बाटलीत ओतताना थोडा सुगंध मधल्यामधे उडून जाण्याचा संभव असतो ! सुदैवाने येथे तसे घडलेले नाही. उलट, ‘ मराठी इडियम ’ ( मराठी वळण ) बरोबर मदतीला घेऊन दहिवाडकर मूळची सुखःदुखांची किंवा व्यथावेदनांची कंपने जशीच्या तशी आपणापर्यंत आणून पोचवितात. एकदोन स्थळे सहज पहाण्यासारखी आहेत.

मूळ काव्यचरण आहेत :

Hunger is a curse which destroys a person
physically, mentally and spiritually.

मराठीत अवतरण दहिवाडकर करतात—

भूक हा एक प्रचंड शाप आहे
मनुष्याचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अधःपतन करणारा !

येथे मागील-पुढील संदर्भाच्या अनुषंगाने ‘ प्रचंड शाप ’ ही शब्द संहितेची योजना उचितच वाटते. रूपांतराची लय लेखकाला सापडली आहे याची उदाहरणे आणखीही देता येतील. पहा—

People live in slums, ghettos, pavements, streets,
thached huts, in pipes, under the trees
without any civic amenities so essential
for the human growth.

बहुतेक लोक राहतात
घाणेरड्या झोपडपट्टीत, गावकुसाबाहेर वस्तीत, रस्त्यावर आणि पदपथावर
गवताच्या आणि झावळ्यांच्या चंद्रमौळी झोपडीत, सिमेंटच्या पाईपमध्ये…
वेळप्रसंगी झाडाखाली करतात वस्ती
मनुष्यजीवनाच्या विकासासाठी नितांत आवश्यक असणाऱ्या
कोणत्याच सुविधा उपलब्ध नसतानाही राहतात बिचारे या निवाऱ्याला… !
काही लोक असे राहतात तर काही उंच मजल्यांच्या महालातून-बंगल्यातून

ऐषाराम करतात ... आणि या दोहीत निर्माण होते ती एक अश्रूंची दरी !

ही दरी नष्ट व्हावी, हे जागरण करण्याकरिता जणू या कविता जन्म पावल्या आहेत असे वाटते. कविवर्य केशवसुतांनी ' तुतारी ' फुंकून जी समाजविषयक सहानुभूती व्यक्त केली तिची जात या अनुभूतीहून वेगळी आहे, असे वाटत नाही.

' हे दारिद्र्या ' या कवितेचा शेवट विफलतेने ग्रासलेला नाही हे विशेष– आम्ही आमच्या सामर्थ्यानिशी दारिद्र्याचा नायनाट करू, मानवजात सुखी करू आणि ही ( मूळची बहुरत्ना ) वसुंधरा सुस्वरूप करू असेच कवीचे उद्गान आहे.

Mother India ही या संग्रहातील कविता खरोखरच उल्लेखनीय आहे. भारतमातेचे हे एक ' अभिनव ' स्तोत्र आहे. हे एक धर्म-जात-पंथ-भेद विसरून आम्ही एका भूमातेची लेकरे आहोत ही जाणीव येथे प्रबल ठरली आहे.

आपल्याकडे ' सप्तपदी ' ला महत्त्व आहे ! कवीनेही सात वेळा पृथ्वीची प्रदक्षिणा केली आहे. पण नाना देश विदेश पाहूनही त्याचे मन भारतमातेच्या कुशीत विसावत आहे. भारतमाता आणि तिची लेकरे दोन नाहीत याचे भान कवीस आहे. या कवितेतील शब्द न शब्द भावनेने ओथंबलेला आहे.

> राष्ट्र म्हणून दूरचा पल्ला आपणास आहे गाठायचा
> मानवी दयनीयता आणि कष्ट यांचा मागमूस नाही ठेवायचा ! ...
> Mother can be happy
> wher her each and every child is happy
> मातेचं सुख असतं .. तिच्या पुत्राच्या सुखात

म्हणून आपल्याच राष्ट्राला-आपल्या बांधवांना सुखी आणि प्रगत करण्याची आत्मप्रतिज्ञा मोठीच प्रेरक, प्रभावी आहे. सर्व भारतवासीयांना नवतारणाची दृष्टी देणारी आहे.

श्री रामटेके व श्री. अनिल दहिवाडकर यांचे काव्यरूप संवादासाठी व संदेशासाठी अभिनंदन करावयास हवे.

' अश्रू ' हे दुबळेपणाचे केवळ प्रतीक नसून ... ' आमचे अश्रू होतील एके दिवशी ...

मानवतेचे पाईक आणि पुढारी '... हे आत्मप्रचीतीचे बोल आपणास धीराच्या वाटेने नेतील. कुरूपतेकडून सुंदरतेकडे नेतील. मांगल्यमय विश्वाचे दर्शन घडवितील ! यासाठी फक्त हवी अंतकरणात निष्ठा आणि बुद्धीच्या प्रांगणात नवी प्रेरणा. ' भय काय तया, प्रभु ज्याचा रे ! '

६२/४८ एरंडवणे, पुणे ४११००४ वि. म. कुलकर्णी

# अनुक्रम

हे दारिद्र्या !

मानवी अस्तित्व.

जीवनाची प्रार्थना.

अर्थघन जीवन.

जीवनाचा शोध.

अजून एक मूल जन्माला आलं.

आयुष्यक्रम.

भारतमाता.

अश्रूंची दरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## हे दारिद्र्या !

कोण आहे तुझा निर्माता ?
देव, मानव, निसर्ग, वातावरण की
परिस्थिति ?

का घडवलं तुला ?
मानवतेच्या नाशासाठी ?
मानवतेला पिडण्यासाठी ?
मानवतेला कष्ट आणि वेदना देण्यासाठी ?

अरे, दारिद्र्या !
असा निष्ठूर का तूं ?
तुझ्या क्रौर्यानं
अवनीवरील निरागस, निष्प्रभ
मानवता
चिरडून टाकीत आहेस तूं.
वेदनेचा दाह आणि एकाकीपण
करावे लागत आहे सहन
समस्त मानवतेला आज.
जिवंत राहता यावे
कसेतरी म्हणून
धडपडताहेत जन

मोठ्या विपरीत परिस्थितीत !
चमत्कार !
चमत्कार आहे हा
की
जिवंत आहेत ते
अशाही परिस्थितीत.

मानवतेला पिडतांना तुला आसुरी
आनंद होतो का ?
तुझ्या निष्ठूरतेचे
बळी आहेत लाखानं
जगभर,
नाही का होत
याचं तुला दुःख
तीळभर !
लाखो लोकांना
नाही अन्न,
वस्त्र नाही.
नाही निवारा
दवाही नाही.
सुविधा नाहीत साध्या
जगण्याच्या,
मिळत नाही न्यायही,
शापवत झाले आहे
अनेकांना जीवन

जगण्यासारखं
त्यांच्या जीवनात
काही काही
उरलं नाही.

हसतोस का तूं
उपहासानं
मानवांकडे बघून ?
पीडित मानवतेच्या
मूलभूत गरजा जीवनाच्या
भागवू शकत नाही आम्ही
म्हणून !
कीतीतरी मौल्यवान
आणि निरागस जीवांना
मुकलो आहोत
आम्ही.
आज देखील निष्पाप जीव
विलीन होतात
शांतपणे
आपत्तीनं, आणि दु:खानं.
आम्हा गरिबांनाही
आहेत बरं भावना
इतर लोकांसमान.
आमचीही हृदयं
होतात विदीर्ण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

आमच्या प्रियजनांची
दु:खे पाहून.
आमच्या मन:स्तापात
आम्ही एकटे आहोत
आक्रोश करीत
एकांतात,
पण ऐकतो कोण, आमचं ?
ज्यांच्या हाती आहे सत्ता
ते आहेत बहिरे आणि मुके,
आहेत ते ठार आंधळे.
आणि हे पाहून तुला तर
उकळ्या फुटत असतील
आनंदाच्या !
तुझं चांगलंच फावतं ना,
यामुळे !

भूकबळी
पाहिले आहेत मी.
आजाराने मेलेले लोक
पाहिले आहेत मी.
पार बदलता तुम्ही
हा अनुभव घेतल्यावर.
तयार होता तुम्ही,
तुमचं सर्वस्व,
तुमचं जीवन

पिडीत मानवजातीच्या कल्याणासाठी
देण्यास,
हा अनुभव घेतल्यावर.

असते कशी भूक
जाणू शकेल भुकेलाच.
लोक
हुडकत फिरताहेत
कदान्नाही
जिवंत राहण्यासाठी
घासभर अन्नासाठी
आपल्या निष्पाप निरागस
मुलांना
विव्हळताना पाहून
त्यांच्या मातापित्याच्या
आतड्यांना
कसा बसत असेल पीळ
करवेल का
तुम्हाला
कल्पना याची ?
आपल्या क्षुधित मुलांचं
सांत्वन
कसे करत असतील ते ?
अपुरा आहार मिळतो मुलांना
आज देखील, सत्य आहे हे.

बळी पडताहेत मुलं
अपुऱ्या आहारामुळं
आज देखील, सत्य आहे हे.
भूक हा एक प्रचंड शाप आहे.
मनुष्याचा,
शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक
अधःपतन करणारा.
भूक !
भूक तुम्हाला करते प्रवृत्त
भक्षण करावयास काहीही.
कंदमुळं !
पालापाचोळा !
उंदीरही !
काय म्हणावं आपण
या कर्माला ?
भूकेनं आणि रोगराईनं
लोक जातात
यमसदनाला.
ही आत्महत्या ?
की हा योजना बद्ध केलेला
खून !

अरे दारिद्र्या,
आजच्या समाजात
काही लोकांना मिळतं

भरपेट अन्न,
काही लोक मात्र
मरतात भुकेनं
कदान्नही
नाही म्हणून,
हे पाहून
हर्षाच्या उकळ्या
फुटत असतील तुला,
नाही का ?
उपाशी मारीत आहोत
बहुतांना,
आम्ही
तथाकथित सुसंकृत
समाजाचे लोक
आश्चर्य वाटत असेल याचं तुला,
होय ना ?
त्यादिवशी काय झालं,
मेलं एका खेडूताचं मूल
माझ्याच मांडीवर.
अवघ्या तीन वर्षाचं वय,
दूर गावी असलेल्या
दवाखान्यात नेत असता
नाही केली
मृत्यूनं गय !
मानवतेचं रितेपण

उमजलं मला, या घटनेनं.
बिचाऱ्या मातापित्यांचे
विवश अश्रू
तुमचं हृदय
फाडून टाकतात.
पण काय करू शकतो आपण ?
मरण पथो मानवतेसह
शांतपणे
मरतच असतो आपण.
नाही औषध-पाणी म्हणून
मरताहेत आजही लोक
आणि विवशतेनं
आम्हीच आम्हाला विचारतो,
कुठे आहे ते प्रगत वैद्यकशास्त्र ?
कुठे आहेत अत्याधुनिक औषधं ?
कुठे आहेत निष्णात डॉक्टर आणि वैद्य ?
कोणाची सेवा करतात ते ?
माझ्या नजरेच्या टप्प्यात
मला तर
गरीबांसाठी आणि गरजवंतासाठी
एकही डॉक्टर, एकही वैद्य
औषधालाही दिसत नाही.

आपण सर्वांनी
पाहिले आहेत भणंग लोक

पाहिली आहेत नग्न मुले
असं मी समजतो.
त्यांच्या नग्नतेत तुम्ही
प्रदर्शन मांडता आहात.
तुमच्या दुष्टपणाचं.
अरे दारिद्र्या !
निसर्गाचं रूप रौद्र असो,
असो कडक उन्हाळा
वा असो झोंबणारा हिवाळा
अनेकांना
नसतात वस्त्रे
अंगरक्षणार्थ.
नवल वाटत असेल तुला
नाही का दारिद्र्या ?
अंगभर कपडे नसतांना
लज्जारक्षणार्थ
समाजातील कित्येकांना
काही थोडे लोक
तऱ्हेतऱ्हेचे अत्याधुनिक
नवनव्या फॅशनचे कपडे
कसे वापरू शकतात ?

भूमिहीन आणि गृहहीन
बकल आहेत लोक.
निसर्ग दत्त जमीन

आहे भरपूर
पृथ्वीवर
तरीही !
थोडक्यांनी घेतला आहे कब्जा
या जमिनीचा
आणि बहुतेक लोक राहतात
घाणेरड्या झोपडपट्टीत
गावकुसाबाहेर वस्तीत
रस्त्यावर आणि पदपथावर
गवताच्या आणि झावळ्याच्या
चंद्रमौळी झोपडीत
सिमेंटच्या पाईप मध्ये
वेळप्रसंगी
झाडाखाली करतात वस्ती
मनुष्यजीवाच्या विकासासाठी
नितांत आवश्यक असणाऱ्या
कोणत्याच सोयी
याठिकाणी उपलब्ध नसतानाही
राहतात बिचारे
या निवाऱ्याला.
पण काही लोक बांधतात,
महाल,
सुंदर,
अत्याधुनिक
निटसपणे शृंगारलेले अंतरंगात

आणि
शोधताहेत हजारो लोक
निवारा
हताशपणे
डोके टेकवण्यापुरता.

अरे दारिद्र्या !
जीवनातील या परम विसंगतीवर
असावं कदाचित प्रेम तुझं !
लाखो जनांच्या मनांत
निर्माण केली आहेस तूं
भीती आणि असुरक्षिततेची भावना
हात मिळवणी केली आहेस तूं
अमंगळ
कर्दनकाळ मृत्यूशी !
पद्धतशीरपणे छळ मांडला आहेस तूं
मानवतेचा
तिचं नीतीधैर्य खचावं म्हणून
राज्य तुझं पृथ्वीवर
अबाधित राखावं म्हणून.

ओळखून आहोत आम्ही
अरे दारिद्र्या
तुझा दुटप्पीपणा.
तथापि
कमी लेखू नकोस तूं

सृजनशक्तीला
देवाच्या आणि मानवाच्या.
आम्ही मानवाला
चंद्रावर पाठवू शकतो,
आम्ही अणूउर्जा
निर्माण करू शकतो.
अशक्य कोटीतील काहीही
आम्ही शक्य करू शकतो.
मनांत आणलं आम्ही
तर हजारो भुकेल्यांना
भरवू शकतो आम्ही
त्यांना वस्त्र देऊ शकतो आम्ही
त्यांना निवारा देऊ शकतो आम्ही
त्यांना दवादारू देऊ शकतो आम्ही.
यासाठी आम्ही फक्त
झालं पाहिजे संघटित
राबविल्या पाहिजेत
आमच्या योजना
आणि आमची धोरणे
परिणामकारकतेने.

या भूतलावरील
प्रत्येक गावात
आणि प्रत्येक खेड्यात
सज्ज आहोत आम्ही

हे दारिद्या,
तुझ्याशी लढा देण्यास.
त्यासाठी,
लोकशक्तीला एकवटू आम्ही
साधन सामुग्री देऊ लोकांना
मुकाबला करू प्रत्येक ठिकाणी
तुझ्या भरडून काढणाऱ्या शक्तीशी.
म्हणजे,
पददलित आणि अन्याय समाज-उभारणीला
हातभार लावणारे
तुझे हस्तक
या जगातले
होतील नाहिसे
बिनचेहऱ्याच्या प्राण्यासारखे !
स्वस्थ बसणार नाही
आम्ही आता
तुझं उच्चाटन झाल्याशिवाय !

जाणीव असलेली माणसं
घेऊं या, यासाठी.
सहृदय असलेली माणसं
घेऊं या, यासाठी.
दुसऱ्यासाठी राबणारी माणसं
घेऊं या, यासाठी.
आमच्या संस्था आणि संघटना

लोकाभिमुख करणार, यासाठी:
तुझ्या दुष्ट योजना हाणून पाडण्यासाठी
फुलवतील ते आशा.
त्यांच्याजवळ उपलब्ध असणाऱ्या
साधनसामुग्रीचा
करतील ते वापर
सर्वसामान्यांच्या भल्यासाठी.

राजकारणी असावेत
आमच्या सरकारात
लोककल्याणाला बांधून घेतलेले असे.
विचारी आणि धोरणी
परिणामकारक योजना
राबविणारे !

गरीबातील गरीबांची
बाजू मांडतील जे,
त्यांच्या भल्यासाठी
भांडतील जे
असे राजकारणी असावेत
आमच्यात.
धंदा म्हणून जे शिरले राजकारणात
असे राजकारणी नकोतच मुळी !

आमच्या समाजाची
सामाजिक, आर्थिक, राजकीय

चौकट
बदलून टाकू आम्ही.
ही मानवतेभिमुख असलेली
चौकट
प्रेम आणि न्याय करील निर्माण.

प्रगत आणि प्रगतीशील राष्ट्रे
मग खाद्याला खांदा भिडवून
करतील काम जोमाने
तुझी, हे दारिद्र्या,
या अवनीवरून
हकालपट्टी करण्यासाठी.
आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी
प्रत्येक राष्ट्र करील उत्पादन
आपल्या गरजेनुसार
प्रत्येक राष्ट्र करील वस्तूंचा वापर.
वैश्विक पातळीवरून
हे दारिद्र्या,
आम्ही तुझा नायनाट करू.
मग ही सुस्वरुप वसुंधरा
आपण प्रत्येकाने राहावे
अशी जागा होईल.

त्या दिवशी
आमच्या प्रिय दारिद्र्या,

आम्ही विचारू तुला—
लपला आहेस कुठं तूं ?
तूं आणि तुझी कुरुपता
जगाच्या कोणत्याच कोपऱ्यात
आता दिसत नाही.

८

## मानवी अस्तित्व

आमच्या निर्मितीच्या उगमा,
आमच्या आयुष्याचा हेतू
आहे तरी काय ?
केवळ जगत राहणं
की त्याही पलीकडे
काही भव्यदिव्य
आयुष्य जगणं ?
पण खरंच का,
आमचं आयुष्य
जगण्यायोग्य आहे ?
उपयुक्त आहे ?
हेतुपूर्ण आहे ?
सुसंगत आहे ?
आमचं आयुष्य

आमच्यासाठीच आहे का?
की इतरांसाठीही आहे ते?

जगाचे मार्ग
विपरीत आहेत फार
श्रीमंत वा मध्यमवर्गीय कुटुंबात
तुम्ही असाल जन्मला तर
मागच्या पिढीपेक्षा काहीतरी
भरीव कामगिरी
करावी तुम्ही
अशी बाळगली जाते अपेक्षा
पण गरीब कुटुंबात
जन्मास जर आलात
तर
आयुष्यभर
झगडावं लागतं
जीवन जगण्याची साधनसामुग्री
मिळविण्यासाठी !
नसतात तुम्हाला
इतर काही
आशा आकांक्षा

आजच्या समाजाच्या
मानदंडानुसार आम्ही इच्छितो की,
चांगलं शिक्षण मिळावं,
चांगलं बालपण जावं.

नोकरी मिळावी उत्तम.
गृहिणी मिळावी सर्वोत्तम.
असावं घरकुल छान.
मुबलक असावं बँकेत धन.
मुलं असावीत चांगली
नातवंड व्हावीत तशीच
आणि शेवटी विलीन व्हावं
प्रतिष्ठितपणे अनंतात
आप्तजनांच्या उपस्थितीत.

स्पर्धात्मक, भौतिक विचारांच्या
आणि आचारांच्या गराड्यात
गुंतलो आहोत आज आम्ही,
यशस्वी झालो तर
वर्षाव होतो स्तुतिसुमनांचा
अपयशी ठरलो तर
टीकाविषय होतो आम्ही लोकांचा.
म्हणून, धडपडावं लागतं
आयुष्यभर यश मिळविण्यासाठी
आणि हरवतो आम्ही स्वतःला
या "शर्यतीत" धावत असताना.
राखावा लागतो आम्हाला
आमच्या राहणीचा उंच दर्जा
वायफळ प्रश्न नसतात विचारायचे.
जमवून घ्यायचं असतं
स्वतःचं परिस्थितीशी

आणि सुरळीत होतं सर्व काही.
तद्नुसार आम्ही
आखल्या आहेत
आमच्या योजना,
ठरविली आहेत आमच्या
जीवनाची उद्दिष्टये.
यश हेच माप आहे
जीवन मोजण्याचं.
जीवनात यशस्वी झालंच पाहिजे.
येनकेन प्रकारेण.
संधिसाधू व्हावं लागतं आम्हाला
आमच्या आयुष्याला
देण्यासाठी आकार
मग ( आम्ही ) व्यापारात असो,
उद्योगधंद्यात असो,
सरकारात असो,
धार्मिक क्षेत्रात असो,
वा कोणत्याही इतर क्षेत्रात असो,
गत्यंतरच नसतं
असं
संधिसाधू झाल्याशिवाय !

आमचं जीवन
राहिलं नाही आता आमचं.
भौतिक यशासाठी
वाकवावं लागतं परिस्थितिनुरूप त्याला.

द्यावा लागतो आकार त्याला
या जगाच्या
भौतिक अपेक्षेनुसार.

या प्रक्रियेत आम्ही होतो
आत्मकेंद्रीत
आत्मप्रौढी मारणारे
अंध, असहाय्य प्राणी !
कसेतरी जगणारे
तणावाखाली
भीतीने, निराशेत.
आम्ही सुखात असल्याचं
भासविलं जगाला,
आम्ही जीवनाचा उपभोग
घेत असल्याचं
दाखविलं जगाला
देव आणि मानव यांच्याशी
सुसंवाद राखून असल्याचं
प्रदर्शन केलं जगाला,
तरीही आम्ही
या तथाकथित नवसमाजाची
ठरतो निर्मिती.

दंग आहोत एवढे आम्ही
आमच्या कामात आणि व्यवसायात,
आयुष्य उभारणीच्या धुंदीत

की
जीवनाची गुणवत्ता असलेलं
आमचं माणूसपण
हरवत आहोत आम्ही.

गुंतलो आहोत एवढे आम्ही
स्व:च्याच जीवनात
की
मानवी अस्तित्वाचा हेतुच
विसरलो आहोत आम्ही.
अंध झालो आहोत आम्ही
जीवनाच्या वास्तवतेला.
दिसत नाही आम्हाला
आमच्यात बसलेले
उपाशी
बेघर
बेकार
नग्न
रुग्ण
अशिक्षित
पिळले जाणारे
तुडवले जाणारे.
दुःखी कष्टी मानवतेच्या
भरवस्तीत राहतो आम्ही,
घेरले आहे आम्हाला

आपदग्रस्त जनांनी
वेढलो आहोत आम्ही
या दीनदु:खितांनी.
सत्यचित्र आहे हे
आमच्या देशात
आणि जगात.
कसं करता येईल
दुर्लक्ष,
या सत्याकडे ?
अवास्तववादी कसे होऊं शकू आम्ही ?
भुकेनं, ज्वरानं, दारिद्र्यानं
मरताहेत लोक,
बळी पडताहेत ते
अन्यायी आणि जुलमी
सामाजिक, आर्थिक, राजकीय
व्यवस्थेला.
अमानवी करीत आहोत आम्ही
संपूर्ण जगाला.

मानवी दुःख पाहूनही
आंधळ्याचे ढोंग करीत आहो आम्ही.
आक्रोश जनाचा ऐकूनही
बहिऱ्याचे सोंग करीत आहो आम्ही.
लुबाडले जातात लोक
नागवले जातात लोक
आमच्या डोळ्यादेखत

आणि गप्प बसतो आम्ही.

दु:खितांबद्दल कळवळा आहे आम्हाला
आव फार आणतो आम्ही.
पण आमचा कळवळा
वैचारिक पातळीवरच
घोटाळतो आहे, म्हणूनच
मानवी आणि न्याय्य
समाजरचना स्थापन करण्यासाठी
चाललेल्या अखंड लढ्याचा
एक अविभाज्य घटक
बनू शकलो नाही आम्ही.

दृष्टिक्षेप टाकतो आम्ही जेव्हा
आमच्या आयुष्यातील घटनांवर
शोध घेतो-
अर्थ लावू पाहतो आमच्या अस्तित्वाचा ...
तेव्हा
यंत्रवत झालो आहोत आम्ही
असं दिसतं आम्हाला.
जगाच्या वास्तवापासून दूर दूर
गेलो आहोत आम्ही
असं दिसतं आम्हाला.
हे आत्मपरीक्षण
नवी जाणीव निर्माण करतं
मानवी अस्तित्वाचा अर्थ

उलगडण्यास मदत करतं.
ह्या जाणीवेला हवा प्रतिसाद
माणूसकीचा
मानवाबद्दल काळजी आणि आस्था
असल्याचा.

हे अल्पायुष्य
आशा फुलविण्यासाठी आहे.
अभाग्यांची काळजी घेण्यासाठी आहे.
गरीबातील गरीबांच्या सेवेला
वाहून घेण्यासाठी आहे
यातना आणि दुःखांचे निर्मुलन करण्यासाठी
लढा देण्यासाठी आहे,
आमच्यातील माणसांना
पिळणारे, त्यांना पायदळी तुडविणारे घटक
आमच्या समाजाला अमानवी करणार नाहीत,
याची दक्षता घेण्यासाठी,
या लढ्याच्या अग्रभागी
आम्ही असण्यासाठी आहे.
कष्टी मानवतेच्या जीवनात येणारे
हर्ष आणि खेद
वाटून घेण्यासाठी आहे.
मानवतेच्या प्रगतीच्या वाटचालीत
सहभागी होण्यासाठी आहे.
असे करण्यानेच
आयुष्याचा अर्थ आणि उद्देश

समजून येइल आम्हाला.

आमच्यात ही जाणीव
केलीस निर्माण म्हणून
आमच्या निर्मात्याची आम्ही
सदोदित स्तुती करू.
हे देवा,
आम्ही तुझी स्तुती करू.
तुझ्या सेवेची संधी दिलीस
म्हणून, हे देवा,
आम्ही तुझी स्तुती करू.
मानवी गरजांकडे आस्थेनं बघणारं
दिलंस हृदय
त्यांना प्रतिसाद देणारं
दिलस मन
म्हणून
आम्ही तुझी स्तुती करू.
आणि ज्या दिवशी ही जाणीव
होईल निमाण
त्या दिवशी आम्ही म्हणूं;
" हे, तुझ्या झगमगाटानं
डोळे दिपविणाऱ्या जगा,
तुझी भुरळ यापुढे
पडणार नाही आम्हाला
कारण
येथे आणि आता करण्याजोग्या

आयुष्यात,
खूप चांगल्या गोष्टी आहेत
आमच्यापुढे."

## जीवनाची प्रार्थना

माझ्या प्रभो,
अडाणी, अशिक्षित आहे मी.
नाही करता येत म्हणून
तुझी प्रार्थना मला.
मी शिकलं पाहिजे,
मला शिकविलं पाहिजे
याची गरजच नाही वाटला
कोणाला.

प्रभो,
माझा आनंद आणि माझी दु:खें
निवेदन करतो तुला तेव्हा
बळ प्राप्त होतं; दिलासा मिळतो.
मी पुत्र आहे निर्धन मातापित्याचा;
वाढलेला गरीबीत.
घाबरू नका यामुळे कोणी,
शिकलो आहे मी

वास्तवतेशी जुळवून घ्यायला.

आता मोठा झालो आहे मी
आणि देवा,
भरपूर पोरंबाळं देऊन
तूही आशीर्वादित केलं आहेस मला.

गलिच्छ वस्तीत रहातो मी.
काम नाही, अन्न नाही, वस्त्र नाही.
रोजंदारी करतो.
पाच रुपये रोज मिळतो.
महिन्यातून सातआठ दिवस
मिळतं काम.
बाकीचे दिवस
आरामच आराम.
गरज लागली तेव्हा घ्यायचं,
नको असेल तेव्हा काढायचं.
हा आमच्या कामाचा नियम.
कसं जगायचं या मर्यादित उत्पन्नात ?
कसं जगायचं या बेभरवशाच्या उत्पन्नात ?
कसं जगवायचं एवढं मोठं कुटुंब या
अस्थिर परिस्थितीत ?
कोणीतरी दिला सल्ला –
स्वयंरोजगार का नाही करीत सुरु ?
सरकार, बँका, स्वयंसेवी संस्था
देतात कर्ज.

कर अर्ज.
त्यांच्याकडे चांगल्या आहेत योजना.
भेटलो त्यांना,
आणि समजलं,
त्यांच्या योजना आहेत
पतवाल्यांसाठी.
आम्ही आपले बिनपतवाले,
त्यांच्या योजनेत न बसणारे.

पण जगलं पाहिजे.
मानवी प्रेरणा आहे ती.
बळी तो कान पिळी.
म्हणून सुरू केला धंदा.
पण ते म्हणतात,
"समाजविघातक" आहे तो.
माझ्या कामात मी तरबेज होतो.
पकडला गेलो, एकदा-दोनदा.
बहुदा
मनःपूर्वक केली नसेल मी प्रार्थना
तुझी दयाघना.
तुरुंगात पाठविलं त्यांनी मला
पण सांगू का देवा,
तुरुंगातील लोक आहेत प्रामाणिक !
एकदा का होईना दिवसातून
जेवण द्यायचे मला ते.

पण तुरुंगाबाहेर असताना
एक वेळचं तरी जेवण द्यावं याला
समाजाला मात्र असं कधी
सूचलं नाही.
पुन्हा एकदा मीं आता
मुक्त समाजात आलो आहे सुटून.
सुरू केलं आहे माझं पूर्वींचं काम
मी खूप मेहनती आहे इसम.
थांबवू शकत नाहीच मी माझं काम.
तीं माझी गरज आहे.
कामाच्याबाबतींत निवड आहे कुणाला ?
मुलं वाढताहेत.
काय आहे त्यांच्या प्राक्तनात ?
पित्याला वाटतं,
त्याची मुलं सुखात असावी.
पैशाची चणचण त्यांना नसावी.
म्हणूनच पिता झालो ना ?
माझी मुलगी लागली आहे धंद्याला.
तिला वाटतं तिच्या धंद्यानं
मदत होईल कुटुंबाला.
बघवत नाही तिला
कुटुंबाचं उपवाशी मरण.
देवा, हा त्याग किती निरागस आहे.
होय ना ?
लाज वाटते रे.
श्रीमंत समाज आमचा देह

खरेदी करू शकेल, निश्चितच;
पण आत्मा ?
तो मात्र आमचा आहे !

माझी पत्नी,
कष्टकरी स्त्रीचं
प्रतीक आहे जिवंत.
माझ्या देवा,
तिने केलेला त्याग
आहे अगणित.
मोलकरीण आहे ती.
पगार, वीस रुपये महिना.
वर एक वेळचं जेवण.
धुणी, भांडी, स्वयंपाकपाणी
मुलांची निगराणी
दळण कांडण, पडेल ते काम
घरातलं
वीस रुपयात, लागतं करावं.
तरीही मालकिणीचं तोंड वाकडं.
देवा, खरं तर
माझ्याच मुलांना त्यांच्या आईची
देखरेख हवी
प्रेम हवं
जिव्हाळा हवा.
पण घरचं सोडून करावं लागतं
दारचं तिला

परिस्थितींमुळं, वीस रुपयांसाठी.
अशा या परिस्थितींत
समाजाची प्रगतीं होईल का ?

माझ्या प्रभो,
खरं सांगतो हा नोटेचा कागद
दिवसेंदिवस होत आहे बलशाली
आवर त्याला आताच.
नाहीतर होईल तो सर्वशक्तीशाली
दुसरा परमेश्वरच !
या कागदानंच
निर्माण केला आहे
श्रीमंत आणि गरीब
बलवान आणि बलहीन !

बायको मोलकरीण !
मुलगी वेश्या !
मुलं
नग्न, भुकेली, रोगी, अनपढ
बघवेल का कोणाला ?
मला तर देवा,
नाही बघवणार !
नाही बघवणार हे !!

माझा पुत्र, व्यक्ती आंहे एक थोर.
सध्या आहे तो बेकार.
कोण त्याला रोजगार देणार ?

लाखो बेकारातला तोही एक.
जाणीव आहे देवा, त्याला याची.
त्याचं बोलणं मला
नेहमीच अर्थपूर्ण वाटतं देवा.
तो म्हणतो,
" आजच्या समाजाचा विनाश केला पाहिजे.
त्याच्या चौकटी पाडून टाकल्या पाहिजे.
आणि या समाजाच्या राखेवर
घर उभारलं पाहिजे,
नवसमाजाचं
ज्या समाजात
मानवाला प्रतिष्ठेनं येईल जगता. "
हा त्याच्या एकट्याचाच आक्रोश नाही.
हजारो कष्टकरी
आपल्या अंतःकरणात
बाळगून आहेत ही उर्मी.
ज्वालामुखीचा उद्रेक होतो,
तेव्हा फारसं कांही बिघडत नाही ?
दृगोचर होऊ लागला आहे क्षितिजावर
मानवी ज्वालामुखीचा उद्रेक.
आमचा विश्वास आहे देवा
की तू गरीबांचा आहेस वाली
बलहिनांचा तू आहेस त्राता
हीच सुवार्ता
तू स्वतः या जगात येऊन

आहेस सांगितली.
गायब असतो माझा मुलगा
आठवडेच्या आठवडे घरातून
न्यायाच्या लढ्यासाठी
लोकांना संघटित करण्यासाठी.
मला मोठा अभिमान वाटतो,
त्याचा देवा.
त्याचा मार्ग पटतो मला.
आशा वाटते त्याच्या धडपडीमुळे
त्याच्या उज्ज्वल भवितव्याची.
पण माझ्या इतर मुलांचं काय?
सरकारने, धर्मसंस्थेने, समाजाने
ठरवायचे आहे ते.

प्रभो,
मिशनच्या शाळा महागड्या आहेत.
ते म्हणतात –
आम्ही दर्जेदार शिक्षण देतो.
उद्याचे जबाबदार
नागरिक घडवितो.
शिक्षणाच्या सरकारी योजना
आहेत आश्वासक
पण थांबावं लागेल
त्यांची अंमलबजावणी होईस्तोवर
तोवर लाखो मुलं राहतील
वंचित

शिक्षणापासून.

म्हातारा झालोय मी.
ते म्हणतात –
मी आता लवकर मरणार.
काय पण बरं वाटतं.
ते म्हणतात –
मी मिशनच्या दवाखान्यात जावं.
प्रकृती दाखवावी डॉक्टरला.
डॉक्टर तपासतात. सांगतात –
एक्स रे काढा.
इंजेक्शनं घ्या.
ऑपरेशनही करावं लागेल, कदाचित.
मी म्हणतो –
डॉक्टरसाहेब, यांचा खर्च कसा झेपेल मला.
तो तुझा प्रश्न आहे.
माझ्या दवाखान्यात मी
उत्तम औषधोपचार करतो.
आणि आता आमचे दवाखाने
स्वावलंबी झाले पाहिजेत ना ?
म्हणून गेलो मी
सरकारी दवाखान्यात.
तेथील खाक्याच निराळा !
अनेक हेलपाटे घातल्यावर
तपासलं मला डॉक्टरनं
औषधाची दिली

भली मोठी यादी
त्यातलं लाल रंगाचं औषध
तेवढं मात्र होतं फुकट.
पण आराम नाही.
मी जगलो काय नि मेलो काय ?
काय महत्त्व आहे मला ?

आता काय करावं ?
करू लागलो विचार.
देवा, तूही माझी
करू नकोस काळजी.
दुःख सहन करण्याची
प्रचंड क्षमता
आहे माझ्या अंगात.

ते सांगतात मला —
मी नरकातच जाईन ( असलाच तर )
मी पापी आणि गुन्हेगार होतो ना,
म्हणून.
तथापि देवा,
तुझ्या भक्तांनी या पृथ्वीवर
निर्माण केलेल्या नरकापेक्षा
या पृथ्वीवरील तुझ्या भक्तांच्या
न्यायापेक्षा,
माझ्या देहात दुःख सहन करण्याची
आहे प्रचंड शक्ती म्हणून म्हण

पण
देवा तुझा नरक ( असलाच तर )
आणि तूझा न्याय
माझी खात्री आहे देवा,
माणूसकीला धरून असेल.
या पेक्षा वेगळं काही मला
करताच आलं नाही,
जगताच आलं नाही.
आता मात्र आहे देवा
उत्सुक प्रतिक्षा
तुझं राज्य
या पृथ्वीवर अवतरण्याची !

आता शेवटची प्रार्थना
ऐक देवा.
तुझ्या सरकारला
तुझ्या समाजाला
तुझ्या धर्मसंस्थेला
तुझ्या उत्तम नागरिकांना
' आपल्या शेजाऱ्यावर
करायला प्रीती '
त्यांनी क्रियाशील व्हावं
म्हणून
प्रेरणा दे.
उत्तेजित कर.
असं करणं आवश्यक आहे

याची त्यांना
खात्री पटू दे.
म्हणजे तेही
आमच्या दुःखात आणि लढ्यात
होतील सामील
आमची आशा तीच त्याचीही
आशा,
तीच तुझीही आशा.
देवा, खूप विलंब झाला आहे नाही ?
तातडीनं कामाला लागलं पाहिजे.
माझी प्रार्थना संपली देवा.
आता आहे मी तयार
तुझ्या दयेचा
तुझ्या न्यायाचा
स्वीकार करण्यासाठी.

□

## अर्थघन जीवन

अर्थघन आहेस तू जीवना
गूढ आहेस तू एक.
अथांग सागर
जीवनाचा

करीत असताना पार
प्रयत्न करीत असतो आम्ही
जीवना
तुझी अर्थघनता
समजून घेण्याचा.

जीवनाची अर्थघनता दिसेल
ज्यांनी
चक्षू असे दे आम्हाला.
जीवनाची अर्थघनता ऐकता येईल
ज्यांनी
कर्ण असे दे आम्हाला.
ह्या अर्थघनतेच्या हाकेला प्रत्युत्तर देईल
जे
हृदय असे दे आम्हाला.

जीवनातील तणावात, नैराश्यात, कष्टातही
शोध घ्यावा या
अर्थघनतेचा आम्ही.
कारण त्यामुळेच
येणार आहे चव
आयुष्याला आमच्या
इतरांसाठी जगण्याच्या
प्रेरणा
ही अर्थघनताच
प्रदान करणार आहे

आम्हाला.
जीवनातील अर्थघनताच ही
सृजनशील बनविते आम्हाला,
अभाग्यांची करण्यास सेवा
प्रवृत्त ती करते आम्हाला.

समजाऊन घेऊं आता
आपल्या प्रत्येकाच्या व्यक्तिगत
जीवनातील अर्थघनतेचा अर्थ
आणि उद्देश.
अजूनही नाही झालेला विलंब !

जीवनातील अर्थघनतेचा शोध
देईल स्फूर्ती आपणाला
आपल्याजवळ जे आहे त्यातले
अत्युत्तम ते द्यायला
आपल्या वातावरणाला
लोकांना
आणि देशाला.

## जीवनाचा शोध

माझ्या आत्म्याला मी विचारलं,
असा तूं

विस्मित का ?

का होतोस तूं कष्टी
जीवनातील एवढ्यातेवढ्या न्यूनतेनं
या लहान लहान गोष्टीच
करतात
समृद्ध
आयुष्याला.

का जोडूं नयेस तूं
नातं शांततेचं
देवाशी आणि माणसाशी ?
का जुळवूं नयेस तूं
स्वर अपुल्या जीवनाचे
देवाशी आणि माणसाशी ?

एवढं का महत्व द्यावंस तूं
दैनंदिन आयुष्यातील
कुचकामी गोष्टींना !
जीवन महान आहे,
थोर आहे,
तुझ्या कल्पनेहूनही आहे श्रेष्ठ !
तसलं जीवन
जगावंस तू !

जीवनाची क्षितिजे आहेत
विस्तृत आणि महाविशाल

म्हणून जगावा
क्षण न् क्षण, तूं
नवनिर्मिती करीत.
हे सुन्दर जीवन जगण्याची
लाभेलच पुन्हा संधी
असं नाही करता यायचं
भाकीत.

□

## अजून एक मूल जन्माला आलं

पुत्र जन्माचा दिवस; आनंदाचा दिवस
मानला आहे जगातील संस्कृतींनी
हे सानुल्या, विशुद्ध असा आला आहेस तूं
या जगात.
किती निरागस आहेस तूं !
या दुनियेची कठोरता
ठाऊक नाही तुला.
हे छकुल्या,
तुला दुध मिळालं पाहिजे.
अंगडंटोपडं मिळालं पाहिजे.
निवारा मिळाला पाहिजे.
औषधही मिळालं पाहिजे.

तुझी काळजी घेतली गेली पाहिजे.
तुला प्रेमही मिळालं पाहिजे.
हे तर तुझे जन्मसिद्ध हक्क आहेत.
ह्या तर तुझ्या मुलभूत गरजा आहेत.
हा समाज तुझ्या ह्या गरजा भागविल का ?
तुझ्यासारख्या लाखो बालकांच्या
ह्या मुलभूत जीवनावश्यक गरजा
नाही पुरविल्या जात.
तू जगशिल की नाही,
महत्त्वाचं नाहीच मुळी ते.
जन्ममृत्यूच्या कुंपणावरची
तू केवळ एक संख्या आहेस.
जगाला तुमची ओळख पटण्यापूर्वीच
तुझ्यासारखी छानछान
सुंदर सुंदर
लहान लहान
अनेक बालकं
निघून जातात, दूरच्या प्रवासास.
क्लेशात, मुकाटपणे.
ज्यासाठी तुझ्या निर्मात्यानं
घडविलं होतं तुला,
ते जगातलं भलंबुरं बघण्यापूर्वीच
निघून जातात, त्या प्रवासास
तुझ्यासारखी निरागस बालकं.

अरे सानुल्या,

श्रीमंत घरात तरी जन्माला यायचा होतास.
भूमिहीन शेतमजूराच्या घरी
का रे बाबा आलास तू.
आयुष्यांतली फार मोठी चूक
केलीस बरं बाळा !
काय नशिबात असेल तुझ्या ?
चमत्कार घडून
तू वाचलासच आणि मोठा झालासच
तर जिवंत राहिल्याबद्दल
पस्तावा करणार आहेसच तू.

तुझी आईही शेतमजूर होती.
राबत होती शेतात, कुटुंबाला पोसण्यासाठी,
तुझ्या आगमनाच्या क्षणापर्यंत !
या बाळंतपणात तुझ्या आईचा
पुनर्जन्मच झाला जणू.
तुझ्या बापात
नव्हती रे ऐपत
तुझा जन्म सुकर व्हावा म्हणून
तुझ्या आईला दवादारू देण्याची.

छकुल्या !
या जगात तर आलास तूं
पण आता एकाकीपणे
झगडावं लागेल तुला
तोंड देत जीवनमृत्यूला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७५
२३०५९
काव्य
२४।२।८२

तुझा समाज, तुझं सरकार
नको ठेवूस अपेक्षा
त्यांच्याकडून फार.
ते इतर महत्त्वाच्या कामात
आहेत व्यस्त.
तुझ्या जीवनाच्या आकांताचा
परिणाम होणार नाही त्यांच्यावर.

तुझ्या जन्मापासूनच
लढा झाला आहे सुरू
जीवनाचा.
तुझ्याच प्रयत्नांनी आता
जगलावाचलास तू तरी
लक्षात ठेव,
यापुढं
स्वतःचं अस्तित्व टिकविण्यासाठी
लागणार आहे
सतत लढावं तुला.

तुझ्या आयुष्याची कहाणीहि
तुझ्या बापजाद्यांसारखीच असेल
ते पिढ्यान्‌पिढ्या होते शेतमजूर
तुझे वडिलही शेतमजूर
आणि तूही होशील शेतमजूर.
तुझ्या पुढच्या पिढीलाही कदाचित
व्हावं लागेल शेतमजूर.

भूमिहीन मजूर म्हणूनच तू मेलं पाहिजेस.
आयुष्यभर !

हे तान्हुल्या.
तुझ्या बालपणी तुला नसणार
शिक्षण
कपडे
अन्न
घरदार
दवादारू
कष्टाला जुंपून घ्यावे लागेल तुला
बालपणापासून
अल्पशा उत्पन्नासाठी.
आणि सरेल तुझं बालपण
अज्ञानात, पिळवणूकीत
हे नाही ते नाही करीत.
हे छोट्या बाळा,
तू एकाकी नाही आहेस रे
जगातील अनेक बालकांना
तुझ्यासारखेच घ्यावे लागतात अनुभव
तुझ्या भुकेत
तुझ्या नग्नतेत
तुझ्या शारीरिक दुर्बलतेत
तुझ्या मातापित्याच्या भग्न हृदयातून
झिरपणारे अश्रू
लपवताहेत ते.

आपल्या मुलांच्या यातना बघून
आनंदोत्सव साजरा करणारे मातापिता
निर्माण केले नाहीत अजून या जगानं.

ठीक आहे.
बालपण तर जिंकलंस तूं
आता प्रौढ झालास.
दोन दिवस काम
चार दिवस घरी
होईल आता सुरू.
तुला जिवंत राहता येईल
फक्त तेवढाच रोजगार
होईल आता सुरू.

नियमित पगार मिळणार नाही तुला
औषधोपचार, मुलाचं शिक्षण,
भविष्यनिर्वाहनिधी,
ग्रॅच्युईटी आणि बोनस,
नोकरीत सुरक्षितता,
काही काही काही नाही.
काम करशील त्या दिवशी
दाम मिळेल.
त्या रात्री पोटाला भाकरी मिळेल
आजारी पडून चालायचं नाही तुला
एक दिवसही.
आजारी पडलास की

खाडा झाला
म्हणजे रोजगार गेला
म्हणजे भाकरी बुडाली
म्हणजे कुटुंब उपाशी
या परिस्थितीत
शारीरिक कष्टच उपसावे लागतील तुला
विचार करता येणार नाही.
पगारवाढ मागता येणार नाही.
मागितलीसच तर डच्चू मिळेल.
रांगा लागल्या आहेत तुझ्यामागं
बेकारांच्या
तुझं काम मिळावं म्हणून.
म्हणूनच ईमान राख धन्याशी
आणि कष्ट कर
भरडून टाकणाऱ्या परिस्थितीत.

आता लग्न झालंय तुझं.
एक दिवसात आटोपता घ्यावा लागला
मधुचंद्र तुला.
शरीर गरम होत असलं तरी
चूल थंड पडू देऊन भागणार कसं ?
तुझी बायकोही येते आता शेतावर
मजुरी करण्यासाठी तुझ्याबरोबर.
मौजमजा नशिबी नाही तुझ्या राजा.
मस्त होण्यासाठी पितोस स्वस्त दारू.
भूलवितोस आपले दुःख

तुझ्या गावात मिळणाऱ्या
गावठी दारूत
बस्स !
तेवढाच विरंगुळा तुझ्या आयुष्यात.

दुसरी गंमत म्हणजे बायकोची संगत,
रात्री.
पोरं होतात मग भारंभार
निपजत जातात भावी शेतमजूर
आणि आयुष्याचं रहाट
रटाळपणे फिरत राहातं
त्याच त्या चाकोरीतून
प्रगतीला वाव नाही.
खंगत जातं शरीर
देह होतो म्हातारा
शाश्वती नसते कशाचीच
भीतीशिवाय नसतं आयुष्यात काही
हतबल होतो जीव करायला काही,
स्वतःसाठी-कुटुंबासाठी
हातातोंडाशी रोज असता गाठ
बचत कुठली वार्धक्यासाठी ?
मुलांसाठीही काही
करता तुला आलं नाही.
तझाच मागोवा घेतात ते
जीवनात अस्थिर राहतात ते.
शेवटचे दिवस तुझे

दु:ख आणि दैन्याने भरलेले
कंठतोस मोठ्या जिकीरीनं
बघत असहाय्यतेनं
स्वत:च्या हाडामांसाचे गोळे
दारिद्र्यात खितपत पडलेले.
जगतोस यातनामय जीवन
मुखावर प्रश्नचिन्ह वागवित;
ह्यालाच का जीवन म्हणायचं ?
हाच का हेतु आहे जीवनाचा ?
यात काय आहे जगण्यासारखं ?
आणि या प्रश्नांची उत्तरे तुला
गवसेतोवर
खपला असशील तूं.
अनुत्तरीत ठेवले आहेस तू हे प्रश्न.
कदाचित दुसऱ्यांनी या प्रश्नांची उत्तरे
द्यावी म्हणून !

माझ्या मूला,
आंतरराष्ट्रीय बालक वर्षामुळं
फारसा हुरळून जाऊ नकोस.
तुझं दु:ख जाणून घेण्यात आलं
हे ठीकच झालं.
तुझ्या नावाच्या तुताऱ्या वाजवितो आम्ही
सभा सम्मेलनं, यात्रा आणि मेळावे
यांचा चालला आहे जल्लोष !
जुने कपडे, अन्न आणि खाऊ

तुझ्यासारख्या
'काहीच नाही रें' ना
वाटण्यात येत आहे.
ठीक आहे.
तात्पुरता उपाय म्हणून बरं आहे.
श्रीमंतांना नैतिक समाधान
मिळेलही यातून.
पण यातलं फारच थोडं
तुझ्यापर्यंत झिरपत आहे.
तुझ्या वास्तव कल्याणासाठी
फार थोडं कार्य होत आहे.
मृत्यूच्या सापळ्यातून
मुक्तता करण्यासाठी तुझी
आमच्याकडे काही सुसंगत
योजनाच नाही.
अमलात आणावा असा
कार्यक्रम नाही.
तूं, अन्यायकारी अशा
सामाजिक, आर्थिक, राजनैतिक
घडीची उत्पत्ती आहेस.
ही चौकटच आता आमूलाग्र बदलली पाहिजे.
ही घडी आता विस्कटली पाहिजे.
तुझ्या दारिद्र्याच्या मुळाशी जाऊन
त्याचं निर्मूलन करणारी
मानवतावादी चौकट

तयार केली पाहिजे आम्ही !
ज्यामुळं
जगण्यायोग्य आयुष्य
येईल तुझ्या वाट्याला.

हे बाळराजा,
ही जबाबदारी खरं तर तुझ्या समाजाची
तुझ्या सरकारची,
त्यांनी केलं पाहिजे तुझं रक्षण.
त्यांनी दिला पाहिजे तुझ्या प्रगतीला वाव
मानवतेचे काही बिंद्
आजही आहेत आम्हा मानवात
रूपांतर होवो या थेंबांचे
बाळा, तुझ्या विषयी वाटणाऱ्या
आपुलकीच्या आणि प्रीतीच्या,
महासागरात.

▭

## आयुष्यक्रम

सुंदर आहेस तू जीवना
देवानं दिलेली मोलवान देणगी आहेस तू.
देव जर निर्माणकर्ता आहे आमचा
तर आमच्या निर्मिती मागे

निश्चित उद्देश असलाच पाहिजे त्याचा.
म्हणून व्यर्थ नाही आमचं जीवन
अर्थपूर्ण आणि सहेतुक आहे ते.
पण हे जीवना
तुला समजून घेण्याचा प्रयत्नच
केला नाही आम्ही.
तुझं अस्तित्व गृहीत धरून चाललो.
थबकून थांबून
नाहीं केला कधी विचार
आमच्या आयुष्यातील घडामोडीचा
प्रयत्नही नाही केलेत कधी जाणीवपूर्वक
अर्थपूर्ण आकार, तुला देण्याचा.

स्वयंचलित यंत्र होऊं दिले आम्ही
आमच्या आयुष्याचे
संकुचित कल्पनांनी
आकार घेऊ दिला आम्ही जीवनाला
वरपांगी उथळ गोष्टींना
ताबा घेऊ दिला आमच्या जीवनाचा.
निरुपयोगी, असृजनशील
भंगार बनविलं आम्ही जीवनाचं
लहानलहान तणावांना आणि निराशांना
केन्द्र करून आयुष्याचे
घुटमळत राहिलो आम्ही त्याचे भोवती
आमच्या खाण्यात आणि पेहरावात
दिखावू बनवलं सामाजिक जीवनांत

आम्ही आयुष्याला.
रद्दी होऊ दिली आयुष्याची
जगिक सुखाच्या छायेखाली
झाकून टाकले आयुष्याला.
जीवनमूल्ये भिरकावून दिली
आयुष्याची सुखे शोधली
जगिक आणि नकली.
भान न ठेवले परिस्थितीचे
जगत असता
अवतीभवती वावरणाऱ्या दुःखाचे.
बंधूभाव त्यागला
कोंडले स्वतःत स्वतःला,
नाती न जोडली माणूसकीची
दुजाभाव जोपासला
उन्मळून न आलो कधी
उरी डोंब भावनांचा डांबून ठेवला.
परदुःख मानले शीतल
जीव न आमचा गलबलला
इतरांच्या पाहून यमयातना
थंडथंड ठेवल्या भावना
नाही घातली कधी साद मनमोकळी
अवतीभवती घडणाऱ्या जीवनकलहाला
खोटं खोटं जगतो आम्ही,
दुखवटाही खोटा करतो व्यक्त

इतर कोणी असता संकटात.

आम्ही होतो मी– मी
इतरांना नसतंच स्थान
जीवनात आमच्या
सोयरसुतक नसतं आम्हाला
आमच्या परिसरात घडणाऱ्या
यातनांचं, अन्यायाचं.
आमचे विचार आणि आचार
झाले आहेत वरपांगी
सुखाची सवय
रुळली आहे आमच्या अंगी
आणि हाव सुटली आहे
सुख ओरबाडण्याची
धाव जीवनाची त्यासाठीच
आहे आमची.
म्हणूनच, म्हणूनच,
भूक
दारिद्र्य
आजार
गृहहीनता
एकलेपणा
बेकारी
दु:ख आणि यातना
पिळवणूक आणि अन्याय
या गोष्टींची गंभीरता

लक्षातच येत नाही आमच्या
काही दाखवितात किंचित आस्था
कार्य करतात थोडं
काही देतात दान आणि
समजतात
गंगेत न्हालं घोडं.
एवढ्यानं काही भागणार नाही
एकजीव झालं पाहिजे आम्ही,
दु:ख सहन करणाऱ्या मानवतेशी.
समदु:खी झालं पाहिजे आम्ही
उत्तम जीवनाच्या शोधात भटकणाऱ्या
मानवतेशी.

तथापि दंग आहोत आम्ही
कार्यपद्धती आणि कार्यवाही
कायदेकानू आणि औपचारिकता
यांचाच कीस पाडण्यात.
सभा, सम्मेलन
आणि चर्चासत्र भरविण्यात,
व्याख्यानं आणि परिसंवाद घडविण्यात
नांगराला हात मात्र कुणी घालीतच नाही.
कार्याला प्रत्यक्ष प्रारंभ कुणी करीतच नाही.
आम्हाला रस आहे केवळ
उत्तरे शोधण्यात
विसंवादी विपरीत मानवी परिस्थितीचे,
बुद्धीच्या निकषावर

आमचा हा बुद्धीवादीपणाच
येतो आहे सर्वप्रथम आड
मानवाचे प्रश्न सोडविण्याच्या.
दु:खाच्या आर्वतात
गटांगळ्या खात असतो
मानवी समाज,
आणि आम्हीं बसतो,
विचार करीत.
योजना आखीत.
आराखडे काढीत.
विसर पडतो आम्हाला की
फुलवू शकतो आशा आम्ही
निराशितांच्या जीवनात
चमत्कार घडवून आणू शकतो आम्ही
अनेकांच्या जीवनात,
आमच्या या अल्पायुषातही.

जीवन हा एक सुरुंग आहे पेटता,
तुरुंग नव्हे.
सृजनतेच महान सामर्थ्य
आहे जीवनात.
पण बहुजनहितासाठी
हे सामर्थ्य, ही सृजनशक्ती
राबविली पाहिजे.
खूप खूप शिकायचं आहे अजून
आम्हाला आयुष्यात.

वेळ गेली नाही ती
साध्या साध्या गोष्टीतूनही
मिळविता येईल आम्हाला आनंद.
दुःखी चेहऱ्यावर इतरांच्या
उमटविता येईल हास्याची लकेर.
रडणाऱ्याच्या डोळ्यांचे
पुसता येतील अश्रू.
आक्रोशाचं हास्यात,
खेदाचं हर्षात,
दुःखाचं आनंदात
पर्यावसन येईल करता आम्हाला.
भुकेल्यांना भरविता येईल तर
आजाऱ्यांची सेवा करता येईल तर
वस्त्रहीनांना वस्त्र देता आले तर
सध्याची, सामाजिक, आर्थिक, राजकीय
बदलता आली चौकट तर
निराशाजनक परिस्थितीत रुजविता आली जर
आशा,
अंधारात ज्योत प्रकाशाची तेवविता आली तर
तर या साध्या छोट्या गोष्टीतही
गवसेल
अर्थ जीवनाचा आपणाला.
काम तसं कठीण आहे.
पण आयुष्य आयुष्य म्हणजे तरी
याशिवाय दुसरं काय आहे ?

दिवस उलटतो
रात्र सरते
वर्ष संपते
काळ सरकतो पुढे पुढे
आमच्या आयुष्याला अस्पार्शता.
आणि एके दिवशी
विचार करतो आम्ही
आयुष्यातील श्रेयाचा
कसं जगलो आम्ही ?
सृजनशील होता का आमचा जीवनक्रम ?
इतरांच्या मनात आशा फुलविणारा
होता का आमचा जीवनक्रम ?

मानवी समाजाच्या सुख:दु:खात सहभागी
होणारा
होताका आमचा जीवनक्रम ?

कंबर कसली का आम्ही कधी ?
लढणाऱ्या मानवतेच्या खांद्याला खांदा भिडवून
लढण्यासाठी ?
पुकारलं का बंड आम्ही
अन्यायाविरुद्ध, जाचाविरुद्ध ?

मानवी गरजा समजून घेण्याची क्षमता
असलीच पाहिजे आमच्या जीवनात.
आमच्यापेक्षा कमनशिबी असलेल्या

आमच्याच बांधवांच्या
भल्यासाठी
समर्पित केलं पाहिजे
आम्ही आमचं जीवन.

आमचा आयुष्यक्रम
असा असावा
शोध घ्यावा आम्ही
अशा जीवनाचा
समर्पित करावे असे आयुष्य
देवाला आणि मानवाला.

## भारतमाता

केली आहे मी पृथ्वी प्रदक्षिणा
साताहून अधिक वेळा,
अवलोकिला आहे परदेश
अगदी जवळून.
पण, हे भारतमाते
तुझ्याच कुशीत
मला गवसतो जीवनाचा अर्थ
सापडतं
उद्दिष्ट
जीवनाचं.
थोर आहेस तू.

महान होण्याची संधी
प्राप्त आहे तुला.
आपले हर्षखेद आहेत.
गुंतलेले
एकमेकात.

तुझे देशवासी
असतात दुःखी तेव्हा
तू होतेस दुःखीकष्टी
अश्रू त्यांच्या नयनांतील
अश्रू बनतात तुझे तेव्हा.

राष्ट्र म्हणून लांबचा पल्ला
आपणास आहे गाठायचा
मानवी दयनीयता
आणि कष्ट यांचा
मागमूस नाही ठेवायचा.

माते,
दे आम्हाला आशीर्वाद,
तुझ्या योग्यतेचं
बनावं आम्ही,
असा !

या राष्ट्राच्या हितासाठी
करून घे उपयोग आमचा
उत्तम ते आमच्यातलं

द्यावे तुला म्हणून
स्फूर्ती दे माते
तुझी !

तुझ्या अनेक सुपुत्रांनी
स्वप्राण आहेत अर्पिले
तुझ्या प्रतिष्ठेसाठी,
मग आम्ही
आमचं मन आणि आत्मा
तुझ्या उभारणीसाठी
नाही का देऊ शकणार
हे माते ?
माझ्या भारतमाते !

मातेचं सुख
असतं तिच्या पुत्राच्या सुखात
म्हणून
काम करू या आपण सर्व मिळून
आपल्या राष्ट्राला
सुखी आणि प्रगत करण्यासाठी.
मनावर घेतलं आम्ही
तर करू शकू आम्ही
म्हणून लागू या कामाला आपण
निश्चयाने !
निश्चितपणे !

# अश्रूंची दरी

धीर धर,
माझ्या जीवनातील सहप्रवाश्या !
आपले अश्रू
उभयतांना जोडणारा समर्थ दुवा आहे.

चल प्रवासाला.
अश्रूंच्या दरीतून.
आपल्या दोघांचाही हाच मार्ग आहे.
पण
आपण एकटे नाही या मार्गावर
चालले आहेत हजारो लोक
याच मार्गावरून.

भूकेल्यांचा, आजाऱ्यांचा
वस्त्रहीनांचा, बेघरांचा
प्रेमहीनांचा, एकल्यांचा
पीडीतांचा, आक्रोश
भरून टाकील ही दरी.

अश्रू तरळताना दिसतात
आज अनेकांच्या नयनात
काहींच्या कडा, दिसतात ओल्या
काहींच्या कोरड्या, एवढाच फरक.

आपल्या डोळ्यातले हे
मौल्यवान मोती
मातीमोलानं फेकूं नये आपण.
तेच तर आपणास मिळालेले मौल्यवान
दान आहे.
तेच तर आपलं सामर्थ्यस्थान आहे.
तेच तर आपलं तारण करणार आहे.

विरंगुळा शोधतो आम्ही अश्रूत,
आमचं मन मोकळं करतो आम्ही अश्रूत.
आमच्या भावना आमचं हृद्गत
आमच्या मनातला अंगार ओततो आम्ही अश्रूत.
पण आता
जपून ठेवले पाहिजेत अश्रू
मानवाच्या जीवनात अवतरणाऱ्या
भयानक कालखंडासाठी !
आमच्यातील कमनशिब्यांसाठी !
आता जमवलेच पाहिजे आम्ही अश्रू.

जपून ठेवू आपण आपले अश्रू.
उजाडेल असा एखादा दिवस,
अर्थपूर्ण होतील तेव्हा आपले अश्रू.
मोल येईल त्यांना.
आम्हास दरिद्री ठेवणाऱ्या
लोकांच्या हृदयास
भिडतील आमचे अश्रू.

आम्हास अन्यायाने वागविणाऱ्या
आमच्यावर प्रभावहीन राज्य करणाऱ्या
लोकांच्या हृदयास
भिडतील आमचे अश्रू.
आमचे अश्रूच होतील एके दिवशी
मानवतेचे पाईक आणि पुढारी.

आमच्या अश्रूंच्या थेंबांनी
महासागर भरून जावोत पृथ्वीवरले.
जलौघासारखे वाहोत
मानवजातीला सुखी करोत.
आमचे अश्रू.

आम्ही केला आक्रोश एकेकट्यानं
आम्ही केला आक्रोश एकांतात
आता करू आक्रोश सर्व मिळून
घायाळ मानवतेसाठी.

आरोळी ठोकू प्रचंड
तारस्वरात ओरडून सांगू
आमचे मनस्ताप, आमच्या वेदना.
की आमच्या या आक्रोशाच्या
हलकल्लोळानं
स्वर्ग आणि पृथ्वी
हादरली पाहिजे.

REFBK-0023451
REFBK-0023451

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७५
23759
काव्य